दिनांक १३/११/२०२५

प्रेस नोट

अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या वाहन धारकांवर कारवाई करीता अत्याधुनीक 4D रडार इंटरसेप्टर वाहन बुलडाणा पोलीस दलाच्या ताफ्यात दाखल.

बुलढाणा जिल्हा पोलीस दलास मा. पोलीस महासंचालक, महाराट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडुन अत्याधुनिक 4D रडार असलेले 03 इंटरसेप्टर वाहने प्राप्त झाले आहेत.आज रोजी मा. श्री. निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांच्या हस्ते ०१ वाहन जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा व ०२ वाहने महामार्ग पोलीस केंन्द्र, मलकापुर यांना वितरीत करण्यात आले आहेत. सबंधितांना मा. श्री. निलेश तांबे, पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांनी कारवाई संबंधाने मार्गदर्शन केले. या वेळी मा. श्री अमोल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक, बुलडाणा हे देखील उपस्थीत होते.

अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर 4D रडार इंटर सेप्टर वाहनाव्दारे दंडात्मक कारवाई केल्यास वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. यामुळे रस्ते अपघात कमी होउन जिवीत व वित्त हानी टाळता येणार आहे. प्राप्त इंटरसेप्टर वाहनाव्दारे जिल्हयांतर्गत समृध्दी महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व जिल्हा मार्गावर अतिवेगाने वाहन चालविणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

या इंटरसेप्टर वाहनांमध्ये स्पीड गन व्यतीरिक्त ब्रेथ ॲनालायझर तसेच टींट मीटर देखील उपलबध असुन त्या दवारे मद्यपान करुन वाहन चालवणारे चालक तसेच काचेवर BLACK FILM असलेल्या वाहनांवर देखील कारवाई करता येणार आहे.

सर्व वाहन चालकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, आपली वाहने रस्त्यावर ठिकठिकाणी दिलेल्या वेगमर्यादेतच वाहने चालवावी तसेच वाहतुकीच्या इतर सर्व नियमांचे पालन करावे. जे वाहन धारक रस्त्यावर दिलेल्या वेगमर्यादेचे उल्लंघन करतील त्यांच्यावर 4D रडार इंटर सेप्टर वाहनाव्दारे दंडात्मक करावाई करण्यात येईल.